फळशास्त्र विभाग
उद्यानविद्या विद्याशाखा
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./ फ.रो./पाचर कलम/ ५९१ /२०२३ दि. २५/१०/२०२३

## दर पत्रक सुचना

प्रती,

.................................................
.................................................
.................................................

**विषय: सिताफळवर्गीय व आवळा या फळ पिकाची कलम निर्मिती करिता पाचर कलम बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील फळ झाडांच्या कलमीकरण करण्या करिता इच्छुक ठेकेदारांनी दरपत्रके या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ.क्र. | कामाचे विवरण | शेरा |
|---|---|---|
| १. | सीताफळ /हनुमानफळ /रामफळ पाचर कलम बांधणे | सदर फळपिकांच्या कलम बांधणी करिता स्वतंत्रपणे दर सादर करावे. कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) काम पूर्ण झाल्या नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर अदा करण्यात येईल. |
| २. | आवळा पाचर कलम बांधणे | |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. ०२/११/२०२३ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत. सर्व दर पत्रके हे निम्नस्वाक्षरीकर्ता यांच्या नावे दिलेल्या कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

कामा बाबत नियम व अटी शर्ती :

1. दर पत्रके बंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.
2. लिफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'दरपत्रक : पाचर कलम बांधने'** असे नमूदकरावे तसेच दर पत्रक टपाला मार्फत पाठवायचे असल्यास **विभाग प्रमुख, फळशास्त्र विभाग,कृषि नगर पोस्ट ऑफिस- ४४४१०४ या पत्त्यावर** पाठविण्याचे करावे. तसेच दरपत्रकात संदर्भ क्र. वि.प्र. /४६१ फ.रो./पाचर कलम/२०२३ व दि.२५/१०/२०२३ नमूद करावा.
3. ठेकेदाराने या पूर्वी शासकीय अथवा निमशासकीय कार्यालया मध्ये सदरचे काम केले असल्यास त्या बाबत चे प्रमाणपत्र सोबत जोडावे.
4. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.
5. अडीच लाख वरील अंतिम देयका मधुन एकूण रकमेच्या २ % जि.एस.टी. आणि १ % टी.डी.एस. कपात करण्यात येईल व याचा परतावा आय. टी. रिटर्न भरतांना केल्या जाईल.
6. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
7. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.
8. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.
9. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.
10. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवस करिता अथवा ३१ मार्च २०२४ पर्यंत ग्राह्य धरण्यात येतील.
11. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.
12. **पाचर कलम बांधणे या कामाचा मोबदला दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) काम पूर्ण झाल्या नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर एकूण यशस्वी कलमा नुसार अदा करण्यात येईल.**
13. डीफोलीयेशन केलेल्या नेत्रकांड्याचा पुरवठा विभगा मार्फत केंल्या जातील.
14. दर पत्रक मंजूर करणे व समान दर आढळल्यास त्याबाबत चा निर्णय समितीचा असेल. काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.
15. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.
16. या दर प्रक्रीये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.
17. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत दर पत्रकावर स्वतंत्रपणे अथवा वेगळे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला